**महाराष्ट्र शासन**

**कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग**

# व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

http://admission.dvet.gov.in ; www.dvet.gov.in ; itiadmissions@dvet.gov.in

## शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील ऑगस्ट २०२० सत्रासाठी प्रवेश सूचना

राज्यातील शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील शिल्प कारागीर प्रशिक्षण योजनेतंर्गत (Craftsman Training Scheme) ऑगस्ट २०२० सत्रातील प्रवेश हे केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रीया (Centralized Online Admission Process) पध्दतीने करण्यांत येत असून प्रवेशाची सविस्तर "माहितीपुस्तिका - प्रवेश पध्दती, नियमावली व प्रमाणित कार्यपध्दती" प्रवेश संकेत स्थळावर Download Section मध्ये Pdf स्वरुपात उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

राज्यातील सर्व शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील प्रवेश पूर्ण क्षमतेने होणे, प्रवेश अर्जात दुरुस्ती करणे व इ. १० वी च्या पुरवणी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांसाठी प्रवेशाची संधी उपलब्ध करुन देण्यासाठी प्रवेश अर्ज सादर करणे व प्रवेश अर्जात दुरूस्ती करण्याची सुविधा दि. ०३.०२.२०२१ पासुन पुनश्च: उपलब्ध करुन देण्यात येत आहे. प्रवेशाचे पुढील वेळापत्रक खालील प्रमाणे असेल.

**प्रवेशाचे वेळापत्रक**

| अ.क्र. | प्रवेश प्रक्रीयेचा तपशील | प्रारंभ दिनांक | अंतिम दिनांक |
|---|---|---|---|
| **१.०** | **ऑन लाईन प्रवेश अर्ज करणे** | | |
| १.१ | शासकीय औ.प्र. संस्थेत प्रवेशासाठी ऑन लाईन पध्दतीने प्रवेश अर्ज भरणे, अर्जात दुरूस्ती (Edit) करणे व प्रवेश अर्ज पूर्ण भरल्यानंतर प्रवेश अर्ज शुल्क जमा करणे. | ०३ फेब्रुवारी, २०२१ सायं. ०५.०० वाजेपासून | ०७ फेब्रुवारी, २०२१ सायं.५.०० वाजेपर्यंत |
| **२.०** | **गुणवत्ता यादी प्रसिध्द करणे** | | |
| २.१ | शासकीय औ.प्र. संस्थेत प्रवेशासाठी गुणवत्ता यादी संकेतस्थळावर प्रसिध्द करणे व उमेदवारांना SMS व्दारे कळविणे. | ०८ फेब्रुवारी, २०२१, सायं.५.०० वाजता | |
| **३.०** | **संसथास्तरीय समुपदेशन फेरी** | | |
| ३.१ | सर्व शासकीय औ.प्र. संस्थांतील रिक्त जागा संस्थास्तरीय समुपदेशन फेरीव्दारे भरण्यासाठी उपलब्ध राहतील. समुपदेशन प्रवेश फेरीकरिता उपलब्ध जागांचा तपशील संकेतस्थळावर प्रकाशित करणे. | ०३ फेब्रुवारी, २०२१, सायं. ५.०० वाजता | |
| ३.२ | औ.प्र.संस्थांमध्ये प्रवेशोच्छुक व नोंदणीकृत उमेदवारांनी संबंधित औ. प्र. संस्थेत सकाळी ०८.०० वाजेपासून ते ११.०० वाजेपर्यंत व्यक्तीश: हजर राहुन समुपदेशन फेरीकरीता **दररोज स्वतंत्ररित्या** हजेरी नोंदवावी. | ०९ फेब्रुवारी, २०२१ | १५ फेब्रुवारी, २०२१ |
| ३.३ | संस्थेत त्या दिनांकास सकाळी ११.०० वाजेपर्यंत उपस्थित असलेल्या सर्व नोंदणीकृत उमेदारांची हजेरी संबंधीत संस्थेव्दारे दुपारी ०१.०० वाजेपर्यंत संकेतस्थळावर नोंदविणे. | | |
| ३.४ | संस्थास्तरीय समुपदेशन फेरीसाठी हजेरी नोंदविलेल्या उमेदवारांमधून त्याच दिवशी संबंधित संस्थास्तरावर दुपारी ०१.०० वाजता गुणवत्ता यादी तयार करुन प्रकाशित करणे. | | |
| ३.५ | संस्थास्तरावर तयार केलेल्या गुणवत्ता यादी नुसार उमेदवारांना समुपदेशनाकरिता बोलाविण्यात येईल. प्रवेशाकरिता उपलब्ध जागा, उमेदवाराची मागणी, उमेदवाराची अर्हता या आधारावर प्रवेशाच्या जागांचे वाटप करण्यात येईल. | | |
| ३.६ | सदर प्रवेशफेरीसाठी निवड झालेल्या उमेदवारांनी सर्व मूळ प्रमाणपत्रांच्या पडताळणीनंतर संबंधित औ.प्र. संस्थेत त्याच दिवशी प्रवेश निश्चितीची प्रत्यक्ष कार्यवाही करावी. उमेदवारांनी त्याच दिवशी प्रवेश निश्चित न केल्यास सदर जागा दुसऱ्या दिवशी रिक्त समजुन प्रवेशासाठी खुली करण्यात येईल. | | |
| **४.०** | **खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील संस्था स्तरावरील प्रवेश** | | |
| ४.१ | खाजगी औ. प्र.संस्थांमधील संस्थास्तरावरील जागांवर (माहिती पुस्तिकेतील मुद्दा क्र. १.४ प्रमाणे) संबंधित खाजगी औ. प्र. संस्थाव्दारे प्रवेश निश्चित करणे. | | १५ फेब्रुवारी, २०२१ रा.११.५९ वाजेपर्यंत |

**महत्वाची सुचना :**

१. राज्यातील सर्व शासकीय व खाजगी औ.प्र. संस्थांतील सर्व प्रकारच्या जागांसाठी प्रवेश हे केंद्रीय ऑनलाईन पध्दतीने होत असून केंद्रीय पध्दतीत उपलब्ध जागा व संस्थास्तरावरील जागांसाठी ऑनलाईन अर्ज सादर करणे आवश्यक राहील. कोणत्याही परिस्थितीत ऑनलाईन प्रवेश प्रणाली व्यतिरिक्त प्रवेश घेणाऱ्या उमेदवारांचे प्रवेश ग्राह्य धरण्यात येणार नाही याची सर्व उमेदवार, पालक व औ.प्र. संस्थांनी नोंद घ्यावी.

२. प्रवेश पध्दती, नियमावली, प्रवेश संकेतस्थळाबाबत तांत्रिक व तद्नुषंगिक शंका असल्यास नजिकच्या शासकीय वा खाजगी औ.प्र. संस्थेस संपर्क साधावा अथवा संबंधीत प्रादेशिक कार्यालयाच्या मदत कक्षास प्रवेश संकेतस्थळावर देण्यात आलेल्या दुरध्वनी क्रमांकावर सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत संपर्क साधावा. सदर मदत कक्षास संपर्क साधण्यापूर्वी माहितीपुस्तिका अभ्यासावी.

-Sd-

स्थळ: मुंबई
दिनांक: ०३ फेब्रुवारी, २०२१

(दीपेन्द्र सिंह कुशवाह, भा.प्र.से.)
संचालक